गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १० वा ● सोमवार २७ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 10 | Date : 27/05/2024 blow Monday Page 4 Price 4

# उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हद्दीतील उत्तर, दक्षिण व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे जोमात तर पोलिसिंग मात्र कोमात

## गोगांव चिंचोली कर्नाटकच्या मधल्या मार्गाने रात्री वाळूच्या गाड्या बिदास्त चालू

### अंकित व दूरक्षेत्र पोलीस ठाणे सुधारणे गरजेचे..! :

उत्तर व दक्षिण पोलीस ठाणे आणि वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंकित व दूरक्षेत्र पोलीस ठाणे सुधारणे गरजेचे असून, त्यास कबाड खाण्याचे स्वरुप आलेले आहे. मैंदर्गी, दुधनी शहरातील गेल्या अनेक वर्षापासून आहे त्या स्वरूपातच पोलीस ठाणे कार्यरत, वायरलेस सुविधा मोडकळीस आलेली आहे. याठिकाणी नवीन सर्व सुविधांसह पोलीस ठाणे होणे गरजेचे आहे. दक्षिण पोलीस ठाण्याला जुन्याला नवीन मुलामा दिला मात्र तेथिल बांधकाम अर्धवट आहे. याबरोबरच श्री बसवेश्र्वर मार्केट यार्डा जवळील पोलीस अधिकारी व कर्मचारी क्वॉर्टर्समध्ये असुविधा असल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस महानिरीक्षक गृहनिर्माण, जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी दखल घ्यावेत.

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हद्दीतील उत्तर, दक्षिण व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे जोमात तर पोलिसिंग मात्र कोमात अशी अवस्था झाल्याने त्वरित अवैध बंद होण्याकरिता पंढरपूर व मोहोळच्या धर्तीवर परिविक्षाधीन सहायक पोलीस अधिक्षकांची नेमणूक करण्याची मागणी नागरीकातून होत आहे.



उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हद्दीतील उत्तर, दक्षिण व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका, गावठी दारु, पत्ता, सट्टा, जुगार, चंदन झाड चोरी, गुडगुडी, अवैध प्रवाशी, वाळू व जनावरांचे मास वाहतूक, गुटखा, मावा (खरा), शिंदी, गांजा विक्री, अवैध कत्तलखाना, तीन व चार चाकी वाहनातून अवैधरित्या गॅस भरणे बरोबरच वळसंग हम रस्तावरील लॉजवर तमाशा थेटरच्या नावाखाली देहविक्री अशा एक ना अनेक अवैध व्यवसाय जोमाने सुरु आहे. वाढत असलेल्या अवैध धंद्याकडे पोलिसांचे दुर्लक्ष झाल्याने अनेक कुटुंब देशोधडीला लागली, अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. यामध्ये हद्दीतील युवकांची संख्या अधिक आहे.

हद्दीतील जुगार अड्डे, हे केवळ सोलापूर जिल्ह्यातच नांही तर राज्यात देखील प्रसिध्द आहेत, सोलापूर जिल्ह्यातील कांही मातब्बर अवैध व्यावसायिक उत्तर, दक्षिण व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोठ मोठ्या गावातून अवैध धंदे थाटलेले आहेत. प्रमुख गावांसह खेड्यापाड्यांतही मटका, जुगाराने हैदोस घातला असून, मटका पंटरऐवजी मूळ मालकांवर कारवाई कधीच न झाल्याने पोलिसावर संशय व प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

हद्दीतील अवैध धंदेवाले कडून मोठ्या प्रमाणात मंथली गोळा केला जातोय असा आरोप नागरीकातून केला जात आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हद्दीतील उत्तर, दक्षिण व वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनेक गावामध्ये अवैध धंद्याचा सुळसुळाट सुरू झाला असून सभ्य नागरीकांना याचा हकनाक त्रास सहन करावा लागत आहे.परिसरात अवैध दारु विक्री, मटका व गुटख्याची सरास विक्री सुरु असल्याचे अनेक नागरीकांकडून बोलल्या जात आहे. अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जात आहे. त्यामुळे अनेकांचे संसार उद्धवस्त होण्याचे मार्गावर आहेत. बायका पोरांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच जास्त पैसे मिळण्याच्या प्रलोभनामुळे अनेकजण मटक्याच्या आहारी गेल्याचे आढळून आले आहे. ग्रामीण भागापर्यंत मटका या जुगाराचे जाळे पसरले आहे.मटक्याच्या आहारी गेल्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच या सर्व प्रकारामुळे सामान्य जनता मात्र हैराण झाली आहे.खेड्या पाड्यातील मिसरुड फुटलेली मुले या प्रलोभनाला बळी पडत आहेत. शिक्षण घेण्याच्या वयात मुले अनेकप्रकारचे व्यसनं करु लागली आहेत. ही बाब अत्यंत धोकादायक असून या प्रकाराला कोण खत पाणी घालत आहे. याचाही शोध घेणे गरजेचे आहे.

हद्दीतील उपविभागीय पोलीस अधिकारी, उत्तर व दक्षिण ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि वळसंग पोलीस ठाणे सहायक पोलीस निरीक्षक यांच्यासह अखत्यारीत असलेले विविध पथके काय..? करतात असा सवाल नागरीकातून व्यक्त केला जात आहे.

भुरिकवठे येथे बेकायदेशीर मोठ्या प्रमाणात जुगार अड्डा चालू असून त्यास कुठल्या पोलिसांच्या आशीर्वादाने चालू आहे याचे शोध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लावून त्या अड्ड्यावर कार्यवाही करतील का ? कर्नाटक महाराष्ट्र च्या गोगांव चिंचोली पडसावली मार्गे मोठ्या प्रमाणात रात्री वाळू गाड्या येत असून याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करण्यात आहेत आहे का व एका गाडी मागे पाच ते दहा हजार वसुली करणाऱ्या पोलिसाचे शोध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कधी कार्यवाही करतील

**–बसवराज सोनकांबळे, सोलापूर**

## राज्यात मतदान यंत्रात छेडछाड नाही

मुंबई : महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या मतदानादरम्यान मतदान यंत्रात (ईव्हीएम) कुठल्याही प्रकारची छेडछाड झालेली नाही. राज्यात मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडली असल्याचे, स्पष्टीकरण राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शनिवारी दिले. राज्यात अलीकडेच लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे पाच टप्पे पार पडले. मात्र, मतदानादरम्यान मतदान प्रक्रियेला बाधा आणणारे आणि ईव्हीएममध्ये छेडछाडीचा प्रयत्न करणारे व्हिडिओ समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झाले होते. त्यावरून विरोधकांनी निवडणूक आयोगावर टीकेची झोड उठवत पारदर्शक प्रक्रियेवर शंका उपस्थित केली होती. या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने वरील खुलासा केला आहे. समाजमाध्यमात प्रसारित झालेल्या व्हिडिओची पडताळणी केली असता, मतदान प्रक्रिया बाधित होणारे आणि ईव्हीएममध्ये छेडछाडीचा प्रयत्न होत असल्याचे दाखविले जाणारे व्हिडिओ जुने असून, ते इतर राज्यातील आहेत. या व्हिडिओंचा नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील निवडणुकीशी काहीही संबंध नाही, असा दावा करताना राज्यातील मतदान प्रक्रिया ही संपूर्णपणे शांततेत आणि सुरळीत झाली असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

## जम्मू-काश्मिरात लवकरच विधानसभा निवडणूक

नवी दिल्ली : जम्मू-काश्मिरात लोकसभा निवडणुकीला मिळालेल्या प्रतिसादामुळे उत्साहित असून, या केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणूक घेण्यासाठी निवडणूक आयोग लवकरच प्रक्रिया सुरू करणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी शनिवारी दिली. जम्मू-काश्मिरातील लोकांनाही त्यांच्या सरकारचा अधिकार आहे, असे राजीवकुमार यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. जम्मू-काश्मिरात लोकसभा निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी आणि येथे विधानसभा निवडणूक लवकर होऊ शकेल का, या प्रश्नाला उत्तर देताना राजीवकुमार यांनी सांगितले.

## ‘बेबी केअर’ रुग्णालयाला आग; सात नवजात बालकांचा मृत्यू

नवी दिल्ली : दिल्लीतील विवेक विहार येथील न्यू बॉर्न बेबी केअर हॉस्पिटलमध्ये शनिवारी रात्री उशिरा भीषण आग लागली. या अपघातात सात नवजात बालकांचा मृत्यू झाला आहे. पाच नवजात बालकांवर अन्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अग्निशमन विभागाने दिलेल्यामाहितीनुसार, रुग्णालयातून १२ नवजात बालकांची सुटका करण्यात आली.




यातील सात नवजात बालकांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाल्याने आगीने उग्र रूप धारण केल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, बेबी केअर सेंटरमध्ये आग लागल्याचे समजताच घटनास्थळी घबराट पसरली. आरडाओरडा होत असताना स्थानिक लोक मदतीसाठी धावले. काही वेळातच आगीने वरच्या मजल्याला कवेत घेतले.

पोलीस आणि अग्निशमन विभागासह आजूबाजूच्या लोकांनी इमारतीच्या मागील बाजूच्या खिडक्या तोडून नवजात बालकांना एक एक करून बाहेर काढले. आगीची माहिती तातडीने अग्निशमन विभागाला देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १६ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन विभागाच्या पथकाने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला आणि एक एक करून मुलांना वाचवण्यास सुरुवात केली. मिळालेल्या माहितीनुसार, ऑक्सिजन सिलिंडर रिफिल करत असताना सिलिंडरचा स्फोट झाला. काही वेळातच आगीने उग्र रूप धारण केले.

## अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेतले जाणार नाहीत

### शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना आश्वासन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज** शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोकांचा समावेश करण्यास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी तीव्र विरोध केला आहे.याबाबत ना.रामदास आठवले यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून मनुस्मृती चे श्लोक अभ्यासक्रमात घेण्याबाबत तीव्र विरोध दर्शविला. यावेळी दोघांमध्ये झालेल्या चर्चेत ना.दीपक केसरकर यांनी शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेणार नसल्याचे ठोस आश्वासन ना.रामदास आठवले यांना दिले आहे.त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेण्याच्या विषयाला पूर्णविराम मिळालेला आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले आहे.जातीभेद विषमता आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या भेदभावाच्या अनेक बाबी मनुस्मृतिमध्ये असल्यामुळे मानवतेच्या हक्कासाठी; विषमता आणि जातीभेदाच्या अमानुष रूढी परंपरे विरुद्ध संगर म्हणून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे मनुस्मृती चे दहन करून सामाजिक क्रांति केली.त्यामुळे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाळलेल्या मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात घेण्यास आंबेडकरी जनतेचा तीव्र विरोध असल्याचे ना.रामदास आठवलेंनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना दूरध्वनी द्वारे सांगितले.त्यावर ना.दीपक केसरकर यांनी मनुस्मृती चे श्लोक अभ्यासक्रमात घेणार नसल्याचे आश्वासन ना. रामदास आठवलेंना दिले.



## पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त पिकांचे त्वरित पंचनामे करावे : आ.आवताडे

मंगळवेढा/प्रतिनिधी : वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा मोठा फटका बसून अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाला आलेल्या पिकांचे तसेच अचानक सुटलेल्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी राहत्या घरांचे छत व पत्रे उडून मोठे नुकसान झाले आहे. अशा नुकसानग्रस्त पिकांचे व घरांचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था करावी अशा सूचना पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी दोन्ही तालुक्यातील तहसीलदार, कृषी अधिकारी, महावितरण उपाभियंता व इतर प्रशासकीय अधिकारी आणि पदाधिकारी यांना दिल्या आहेत. दुष्काळजन्य परिस्थितीला तोंड देत असलेल्या मतदारसंघातील अनेक गावांना गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसाचा व वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला आहे.या पावसामुळे केळी, डाळिंब, आंबा आधी फळबागांचे व शेतकऱ्यांच्या घराचे, लाईट पोलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अगोदरच दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच अनेक शेतकरी आपली पिके जगवण्यासाठी संघर्ष करत होते. मात्र, काल व त्याअगोदर काही दिवसांपूर्वी मतदारसंघातील अनेक गावात अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. झालेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना नामोहरम केले असून शेतीचे, फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे.



तसेच अनेकांचे राहते घर कोसळून हक्काचा निवाराही निसर्गाने हिरावून घेतल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांनी विविध नुकसानग्रस्त गावातील घरांना भेटी देऊन आढावा घेतला होता. दरम्यान मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी या सर्व नुकसानग्रस्त बाबींचा आढावा घेऊन शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणांनी त्वरित पंचनामे करण्याची कार्यवाही सुरू करून त्याचे अहवाल नुकसानग्रस्त भरपाई साठी शासन दरबारी सादर करावेत अशा सूचनाही आमदार आवताडे यांनी दिल्या आहेत.

## भरधाव बस झोपडीत घुसून चार मजूर ठार

**पणजी/दैनिक यशसिध्दि न्यूज** भरधाव वेगाने जाणारी खासगी प्रवासी बस शनिवारी मध्यरात्रीनंतर गोव्याच्या वेर्णा औद्योगिक वसाहतीतील रस्त्याच्या बाजूला असलेल्या मजुरांच्या झोपडीत घुसल्याने झालेल्या भीषण अपघातात चार मजूर जागीच ठार झाले तर पाचजण गंभीर जखमी झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार चालू आहेत. झोपडीत घुसलेल्या बसचा चालक अपघातावेळी दारूच्या नशेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून तो जखमी झाल्याने त्याला इस्पितळात उपचारासाठी दाखल केले आहे. त्या अपघातातून सुदैवाने बसमध्ये असलेले प्रवासी सुखरूप बचावल्याची माहिती वेर्णा पोलिसांनी दिली. शनिवारी मध्यरात्री १२.३० च्या दरम्यान वेर्णा औद्योगिक वसाहतीतील रस्त्यावरून एक खासगी प्रवासी बस वेर्णा औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीच्या कर्मचाऱ्यांना घेऊन भरधाव वेगात जात होती. त्यावेळी चालकाचा ताबा सुटल्याने बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका झोपडीत घुसली. अपघातावेळी झोपडीत नऊ कामगार झोपलेले होते.

## संपादकीय

### स्पष्टपणे समोर येईल...

पाचवा टप्पाही पार पडला असून आता केवळ दोनच टप्पे उरले आहेत. त्यामुळे आता लोकांचा चर्चेचा रोख कोणत्या पक्षाची सत्ता येणार यावर केंद्रित झाला आहे. सगळे यू ट्यूब चॅनेल आणि निवडणूक विश्लेषक पाच टप्प्यांच्या आधारे आपापली मते व्यक्त करण्यात व्यस्त आहेत. या सर्वांच्या विश्लेषणाकडे लक्ष दिले तर आज ही सत्तेची स्थिती अत्यंत दोलायमान असल्याचेच संकेत मिळत आहेत. काही जण पुन्हा मोदीच पंतप्रधान होणार असल्याचे छातीठोकपणे सांगत असतात, तर काही जण मोदी पराभूत होणार असल्याची भाकिते करताना दिसतात. तथापि, यात भाजपला मोठा फटका बसणार असल्याची भाकिते सर्वाधिक आहेत. सर्वत्र निकालाची चर्चा रंगत आहे. अशा टप्प्यावर सट्टाबाजारातील लोक काय म्हणतात याचीही अधिक चर्चा रंगते. राजस्थानात जयपूरपासून १६० किमी अंतरावर असलेल्या फलोदीच्या सट्टाबाजाराच्या भाकितांना अलीकडच्या काळात मोठे महत्त्व आले आहे, अनेकांच्या मते, हा बाजार अगदी अचूक भाकीत करीत असतो. कारण त्यावर त्यांचे र्थकारणही अवलंबून असते. त्या बाजारातील सध्याचे भाव लक्षात घेतले तर मोदीच पुन्हा सत्तेवर येणार असल्याचे संकेत मिळतात. दुसरीकडे, सर्व टीव्ही वाहिन्यांवर भाजपच पुन्हा सत्तेवर येणार असल्याचा बोलबाला दिसत असून सर्व यू ट्यूब वाहिन्यांवर मात्र मोदी घरी जाणार आणि इंडिया आघाडीची सत्ता येणार अशी सरळ विभागणी झाली आहे. यू ट्यूब चॅनेलवरही एकापेक्षा एक निवडणूक भाष्यकार आहेत. त्यांनी ग्राउंड रिपोर्टच्या आधारे इंडिया आघाडीचीच सत्ता येणे आता अटळ असल्याचे म्हटले आहे. त्यातही सध्या उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या दोन महत्त्वाच्या राज्यांवर बहुतेकांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यातही अगदी टोकाची भाकिते केली गेली आहेत. महाराष्ट्रात चार ते पाच जागा सोडल्या, तर बहुतांशी जागा महाविकास आघाडी जिंकणार असल्याचे भाकीत केले गेले आहे. तर काही ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडी यांची काट्याची टक्कर होईल; पण महायुतीचाच वरचष्मा राहील असे नमूद केले गेले आहे. टीव्ही मीडियावर मोदींचे एकतर्फी वर्चस्व दिसले तरी सोशल मीडियावर मोदी आणि भाजपला इतक्या टोकाच्या कुचेष्टेला सामोरे जावे लागले आहे की, त्यातून देशात मोठा बदल घडून येईल असे स्पष्ट संकेत मिळत आहेत. चार जूनपर्यंत या चर्चा आता सुरूच राहतील. पण एक जूनला एक्झिट पोलमधून एकूण रागरंग अधिक स्पष्टपणे समोर येईल.

# आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस येण्यासाठीच धर्मांतराची आवश्यकता आहे...

## ४८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

**छत्रपती संभाजी नगर/**
**दैनिक यशसिध्दि न्यूज**

समाज जीवनात कार्यरत बुद्ध फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १७ मे १९३६ ला कल्याण येथील सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस येण्यासाठीच धर्मांतराची आवश्यकता आहे. त्या विधानाची ८८ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ-) आईनाच्या संयुक्त विद्यमाने ४८ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १९ मे २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. सिद्धार्थ पाईकराव म्हणाले की, धर्मांतर हे रातोरात घडून आले नाही. १९०८ ला मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर सी. के. बोले यांच्या हस्ते केळुसकर गुरूजींनी बुद्धाचे चरित्र भेट दिल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धाकडे वळले. १३ आक्टोबर १९३५ ला येवला मुक्कामी धर्मांतराची घोषणा केल्याने धर्मांध लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मद्वेष्टे संबोधले होते. १९२७ चा चवदार तळे सत्याग्रह आणि २ मार्च १९३० चा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहातून हिंदू धर्म दगडासारखा असल्याची जाणीव झाल्याने धर्म बदलण्याची भूमिका मांडली. आणि नागवंशीय लोकांची भूमी नागपूरात १४ आक्टोबर १९५६ ला हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्माचा स्विकार केला. ज्यामुळे खरच आपणास सोन्याचे दिवस आले.

याप्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, माणूस हा केंद्रबिंदू मानून उपेक्षित समाजाला मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य धम्माने दिले आहे, जे भारताचे संविधानात अंतर्भूत केले आहे. प्रज्ञा शील करुणामय धम्म आपणास मिळाला आहे, त्या धम्म उपदेशावर आरुढ होऊन सुख प्राप्ती केली पाहिजे. एड. विलास रामटेके म्हणाले की, क्रांती प्रतिक्रांतीच्या काळातून मार्गक्रमण करीत असताना बुद्ध धम्माचे वाढत असलेले प्रस्थ थांबविण्यासाठी भारताचे संविधानाच्या पुनर्विलोकनाचा मुद्दा पुढे करण्यात आला होता. महादेव डांबरे म्हणाले की, धम्माचे अधिष्ठान नैतिकतेवर आधारलेले असून धर्मात त्याला स्थान नाही. राज्यकारभाराची जाण येईपर्यंत स्वातंत्र्य दिले जाणार नाही, हे इंग्रजांनी स्पष्ट केले होते. त्यामुळे ज्या संविधान सभेची दारे व खिडक्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांसाठी बंद करण्यात आल्या होत्या, त्या संविधानसभेत डॉ बाबासाहेब आंबेडकरांना सन्मानपूर्वक स्विकार करावा लागला. एड. आर. टी. खंदारे म्हणाले की, पूर्वी जी सटवी आपले भविष्य लिहीत होती, ती मात्र बाबासाहेबांचे भविष्य लिहू शकली नाही. सोहेल पटेल म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व धर्माचा अभ्यास करून विज्ञानवादी बौद्ध धम्माचा स्विकार केला. मोहसीन मोहम्मद सय्यद म्हणाले की, हिंदू धर्माप्रमाणे अस्पृश्यावर अन्याय अत्याचार केले जात होते. बुद्धाने त्यांना वर आणण्यासाठी फार प्रयत्न केले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृती दहन केली. तर १३ आक्टोबर १९३५ ला हिंदू म्हणून जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही अशी घोषणा केली होती. ती घोषणा त्यांनी धर्मांतराने पूर्ण केली. डॉ. आर. डी. बडगे म्हणाले की, तळागाळातील माणसांना मुख्य प्रवाहात आणणे हे आंबेडकराईट चळवळीचे कार्य आहे. बुद्ध धम्म जगाच्या पुनर्रचनेचा विचार करतो. करिता माणूसकी प्राप्त करून घेण्यासाठी धर्मांतर केले पाहिजे. प्रा. मंगला झिने म्हणाल्या की, पेशवाईत कमरेला झाडू व गळ्यात मडके अशी अस्पृश्यांची अवस्था होती. हजामत करणारा न्हावी केस कापत नसे. अस्पृश्यांना कुणी राहायला खोली सुद्धा भाड्याने देत नसे म्हणून बडोदा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एदलजी सोराबजी हे टोपणनाव धारण करून पार्शी वस्तीगृहाचा आश्रय घ्यावा लागला. तिथेही माहित पडल्यावर त्यांना जीवघेण्या हल्ल्याला सामोरे जावे लागले. म्हणून त्यांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रतिज्ञा केली. जेणेकरून मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होतील. ते साकार करण्यासाठी त्यांनी आपणास बुद्ध धम्माच्या झोळीत टाकले. डॉ. कैलास झिने म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ लाच घोषणा करतांनी धर्मांतर केले असते, तर त्यांना पुढील २० वर्षे धर्म प्रचारासाठी मिळाले असते. परंतु काळाने ते होऊ दिले नाही ते पूर्णत्वास नेण्यासाठी अनुयायांनी प्रयत्न केले पाहिजेत.

प्रमुख वक्ते डॉ. सन्नी गायकवाड म्हणाले की, धर्मांतर आवश्यक असले, तरी ते घडवून आणण्यासाठी समाजाची मनोभूमिका तयार केली पाहिजे. आपण प्रथम आणि अंतिमतः भारतीय असल्याची भूमिका पार पाडली पाहिजे. जेवढा शिकलो तेवढाच हुकलो, कळलंच नाही मला मी बौद्ध की महार? या संभ्रमातून बाहेर पडले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रामुख्याने आमचे केस कापण्यास न्हाव्यांनी नकार देणे, गोरेगाव परिसरात गाडीवानाची वागणूक आणि बडोदा संस्थानातील अपमानास्पद वागणूक या घटनांचा परामर्श घेतला आहे. त्यात त्यांनी स्पष्ट केले की, ज्या समाजात माणुसकीला थारा नाही तिथे निष्कारण मानहानी सहन करीत जीवन कंठण्यात काय अर्थ आहे? करिता शिक्षण, शस्त्र आणि संपत्ती धारण करण्यास बंदी घालणा-या व्यवस्थेस नाकारून धर्मांतर करणे आवश्यक झाले आहे. ज्यामुळे आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होण्यासाठीच धर्मांतराची आवश्यकता आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मे १९१६ ला कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना डॉ. ए. ए. गोल्डनवायझर यांच्या समोर 'भारतातील जाती : उगम, संरचना आणि विकास' या विषयावर प्रस्तुतीकरण करून जातीची समस्या जागतिक पटलावर मांडली. पुढे १३ आक्टोबर १९३५ ला येवला मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली. तर १९३६ ला लाहोर येथे जात-पात-तोडक मंडळामार्फत होणारी परिषद न झाल्याने त्यात दिले जाणारे भाषण म्हणजे जातीचे निर्मूलन ही पुस्तिका लिहिली. ज्यातून जनमानसात जातीय मानसिकतेचे दुष्परिणाम स्पष्ट केले. धर्मांतर करून बौद्ध होणे म्हणजे भारताचे संविधानाची अंमलबजावणी करणे होय. म्हणून आदर्श समाज निर्माण करण्याची प्रक्रिया राबविली पाहिजे. करिता पुढे २० वर्षांनी १४ आक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्म स्वीकारला. ज्यामुळे संपूर्ण भारत बुद्धमय करण्याचे बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मार्ग मोकळा झाला. तरी समाजातील सक्षम व्यक्तींनी पुढे येऊन या कार्याला गतिमान करीत बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार केले पाहिजे.

या कार्यशाळेला महादेव डांबरे, धनराज गोंडाणे, एड. आर. टी. खंदारे, सोहेल पटेल, मोहसिन सय्यद, एड. विलास रामटेके, सन्नी गायकवाड, एड. सिद्धार्थ पाईकराव, प्रा. मंगला झिने, डॉ. कैलास झिने, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## माझी वसुंधरा अभियान ४.० व स्वच्छ भारत अभियान आढावा बैठक

# पुणे विभागात कोल्हापूर जिल्ह्याचे काम उत्कृष्ट जनजागृती व लोकसहभागातून अभियान यशस्वी करूया : पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

**कोल्हापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील माझी वसुंधरा अभियान ४.० व स्वच्छ भारत अभियानाचे काम उत्कृष्ट झाले असून ३१ मे २०२४ अखेर निर्देशकाचे नियोजन करून जनजागृती व लोकसहभागातून अभियान यशस्वी करण्याचे सूचना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी बैठकीत दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात आयोजित माझी वसुंधरा अभियान ४.० व स्वच्छ भारत अभियान आढावा बैठक पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी पुणे विभाग नगरपालिका प्रशासन उपायुक्त दत्तात्रय लाघी, सहाय्यक आयुक्त नगरप्रशासन देवानंद ढेकळे, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, संबंधित कर्मचारी उपस्थितीत होते.

बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मे २०२४ पर्यंत मुदत वाढ मिळाली आहे. आढाव्यावेळी जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात उर्वरित कालावधीत निर्देशाकानुसार नियोजनबद्ध काम करणे आवश्यक आहे. यामध्ये वातावरणीय बदल जनजागृती, ई-प्लेज नोंदणी व पुर्तता, स्पर्धा, सोशल मीडियाद्वारे अभियानाची प्रसिध्दी, सार्वजनिक ठिकाणी जनजागृती उपक्रम, पर्यावरण सेवा योजनेत शाळांचा सहभाग आदींचा समावेश आहे. जेणेकरून भूमी, वायु, जल, अग्नि, आकाश या क्षेत्रात गुणांकन सुधारता येतील. तसेच, अभियांनाची माहिती संकलन व मुल्यांकनाचा त्रुटींचीही माहिती देवून नियोजनपूर्वक सुधारणा करण्याच्या सूचनांही यावेळी देण्यात आल्या.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे प्रकल्पाविषयी माहिती घेण्यात आली. जिल्ह्यातील मुख्याधिकारी यांनी स्वच्छ भारत अभियानात संबंधित भागातील सुधारणा व प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्ह्यातील सर्वच ग्रामीण व शहरी भागात स्वच्छ भारत अभियानात लोकसहभाग महत्वाचा आहे. केंद्र व राज्य शासनाने प्लास्टिक बंदी केलेली आहे त्याचा अनिधिकृत साठा व विक्री करणाऱ्या घटकांवर कडक कारवाई केली पाहिजे अशा सूचना दिल्या.

प्लास्टिक विरोधात मोहिम

विभागीय आयुक्त यांनी प्लास्टिक हा पर्यावरणास हाणीकारकच आहे असे सांगून मी प्लास्टिक वापरणार नाही,




वापरू देणार नाही याची जनजागृतीही केली पाहिजे. कापडी पिशवी वापरावी. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे.

जेणेकरून कुटुंबातील व्यक्तीही प्लास्टिक वापरास आळा घालतील. प्रेरणा व कृतीत बदल होण्यास समाजातील सर्वच घटकांनी पर्यावरण जनजागृतीद्वारे प्लास्टिक विरोधात मोहिम उभारली पाहिजे असे सांगितले.

या बैठकीत माझी वसुंधरा अभियान ४.०, स्वच्छ भारत अभियान डीप क्लिनींग अभियान, पथ विक्रेता सर्वेक्षण व धोरण, मालमत्ता व पाणीपट्टी कर, प्रधानमंत्री आवास योजना आदीबाबत आढावा घेवून कृती व कार्यातून जनजागृती करण्याची सूचना देण्यात आल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# आर टी ओ प्रवेश प्रक्रियेतील प्रकार खपवून घेतला जाणार नाही : श्रीकांत शिंदे

## आरटीई प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणून होणाऱ्या प्रकारावर कारवाई निर्माण करण्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील कष्टकरी गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातील एक किलोमीटरवर परिसरातील नामांकित शाळांमध्ये प्रवेश घ्यायचा व यासाठी राज्य शासनाने आरटीई म्हणजे शिक्षण हक्क कायदा २००५ पासून राज्यात लागू केला आहे यामध्ये पालकांच्या उत्पादनाची अट जास्तीत जास्त एक लाख रुपये इतकी आहे मात्र हा प्रवेश प्रक्रियेवर अनेक ठिकाणी तलाठी मंडळ अधिकारी अथवा मानसिक प्रशासनाच्या हाताची धरून अनेक धन दांडगे यांचे लोक एक लाखाच्या आतील उत्पन्नाचे दाखले काढून आरटी प्रवेश प्रक्रियाचा गैरफायदा उचलत असल्याची बाब मागील काही वर्षात वारंवार निदर्शनास येत आहे त्यामुळे आरटीआय प्रवेश प्रक्रियेसाठी देण्यात येणाऱ्या उत्पन्नाची दाखल्यांची पडताळणी महसूलच्या विशेष पत्रामार्फत करून गोरगरीब कुटुंबातील पालक आणि पाल्यांवर होणारा अन्याय दूर करणे गरजेचे आहे यासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया पारदर्शकता आणून होणार गैरप्रकार क** निर्माण करून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना लाभ मिळावा अशी मागणी राष्ट्रवादी युवक होण्याचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी सोलापूर जिल्हा गादी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे यावर जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला निवेदनात पुढे असे म्हटले आहे की आरटीई प्रवेश प्रक्रिया प्रवेश पत्र विद्यार्थ्यांचे कुटुंब एक एक किलोमीटर परिसरात वास्तव्य असावे अशी अट आहे आणि त्यापासून काही मानसिक शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी काही घनदागडी लोक जसे खोटे उत्पन्नाचे दाखले सादर करत तसेच सदर शाळेच्या परिसरातील रहिवासी नसल्याचा त्यांचा परिसरातील भाडेकरार करून निवासी राहत असलेली पुरावे सादर करतात वास्तविक पाहता शासकीय कामासाठी केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेली भाडेकराला जर रद्द धरले जात असताना त्यांच्या स्टॅम्प पेपरवर नमूद केलेले भाडेकरार प्रवेश प्रक्रियेसाठी दाखल केले जातात तरी गोरगरीब बालकांच्या आणि त्यांच्या पाडल्यांच्या हक्कावर घराण्याची सदर गैरप्रकार रोखले जावेद अशी मागणी श्रीकांत शिंदे यांनी केली आहे.




### कोणत्याही अनुचित प्रकार घडणार नाही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

जर गोरगरिबांच्या शिक्षणाच्या अधिकारावर अधिकाऱ्यांना संगणमत करून जर कोणी गैरप्रकार करत असतील तर ते माझ्यासमोर मांडा त्यांच्यावर नक्कीच मी ही कारवाई करणार पण यावेळी असा कोणताही अनुचित प्रकार करणार नाही हेही त्यांनी आश्र्वासन दिले


---

बेंडभर पाटलांच्या काव्यसंग्रहाला मिळाले मानाचे स्थान

# मामाच्या मळ्यात पुस्तकाचा पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध युवा साहित्यिक व पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत कार्यरत असणाऱ्या सचिन बेंडभर यांच्या दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केलेल्या मामाच्या मळ्यात या काव्यसंग्रहाची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एम.ए. द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात झाली असल्याची माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवरून नुकतेच कळवण्यात आले असल्याची माहिती बेंडभर यांनी दिली. तसेच हा अभ्यासक्रम येत्या जून पासून सुरू होत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. याआधी सन २०१६ साली त्यांची कळो निसर्ग मानवा ही कविता महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळाने इयत्ता सहावीच्या सुगमभारती या पुस्तकात घेतली आहे. तर मंथन प्रकाशनाने शिष्यवृत्ती सराव प्रश्नपत्रिकेत त्यांच्या येते जगाया उभारी व आजोळ या कवितांचा समावेश केला आहे.




१९ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रकाशित झालेल्या मामाच्या मळ्यात या काव्यसंग्रहाला महाराष्ट्रातून बालकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. लहानांनाच नव्हे तर थोरा मोठ्यांनाही आवडेल अशा या काव्यसंग्रहाचे परदेशातही वाचक आहेत. आजपर्यंत या काव्यसंग्रहाला तीन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. याआधी चंद्रपूर येथील कवितेचे घर यांच्या वतीने बापूरावजी पेटकर बालकाव्य पुरस्कार, ऍक्टिव्ह टीचर सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्या वतीने उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार, साहित्य सेवा प्रज्ञा मंच यांच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट बाल साहित्य पुरस्कार असे प्रतिष्ठेचे मानले जाणारे तीन राज्यस्तरीय पुरस्कार या काव्यसंग्रहास मिळाले आहेत.

मामाच्या मळ्यात या काव्यसंग्रहात लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक कविता असून त्यांच्या ज्ञानात भर पडेल अशा प्रेरक कवितांचा समावेश आहे. बालचमुंसाठी संस्काराची शिदोरी म्हणजे सचिन बेंडभर यांचा मामाच्या मळ्यात हा काव्यसंग्रह! दिलिपराज प्रकाशनने हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून प्रसिद्ध चित्रकार सागर नेने यांनी विषयाला अनुरूप चित्रे व आकर्षक मुखपृष्ठ रेखाटले आहे. प्रसिद्ध बालसाहित्यिक सुरेश सावंत यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे. बालसाहित्यिक सचिन बेंडभर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अभ्यासक्रम मंडळाचे आभार मानले असून त्यांना मिळालेल्या या यशाबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

---

# कमलाई देवस्थान नितीन तापडे यांच्याकडून एक लाख रुपये देणगी

**पंढरपूर/प्रतिनिधी**

श्री जगदंबा कमलादेवी मंदिर ट्रस्टच्या संयोजकाने श्री कमलाई देवी मंदिर रतन संवर्धन कामात गेल्या सहा महिन्यापासून कामास सुरुवात करण्यात आली आहे मंदिर जतन संवर्धनाचे काम प्रगतीपथावर असून ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ छोटे सचिव अनिल पाटील व सर्व विश्र्वस्त यांनी मतीचे आव्हान भक्ताकडे केले होते या आव्हानाला प्रतिसाद म्हणून एन पी कंट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड पुणे चे मालक नितीन पुरुषोत्तम तापडिया यांच्याकडून देणगी रुपये १०००००/एक लाख रुपये धनादेश हे प्राप्त झाले आहे या निमित्त त्यांचा सत्कार विश्र्वस्त सुनील राठोड व्यवस्थापक अशोक ताटे लक्ष्मण हवालदार प्रवीण हिरवडे यांनी सत्कार केला.





यावेळी तापडिया यांची सहकारी सतीश दुकान लष्कर उपस्थित होते या निमित्ताने कमला भवानी मंदिर दिनों तर कामासाठी भाविकांनी सरळ हाताने मदत करण्याचे आव्हान देखील ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात आली आहे तसेच ऑनलाईन देणगीची सुविधा उपलब्ध करून संपर्क अशोक तात्यांनी मोबाईल नंबर ९४०४७०८९२४

---

## बारावी परिक्षेत दिक्षा झळकी हे दुधनी गुरुशांतलिंगेश्वर महाविद्यालयात द्वितिय श्रेणीत उत्तीर्ण

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री गुरुशांतलिंगेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली असून यात विज्ञान शाखेत अवधूत रामचंद्र गद्दी यांनी तर द्वितिय क्रमांक कुमारी दिक्षा सैदप्पा झळकी यांचे घवघवीत यश मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्छ माध्यमिक शिक्षण मंडळाचे नुकत्याच घेण्यात आलेल्या बारावीच्या निकाल जाहीर झाले आहे. त्यात श्री गुरुशांतलिंगेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे कला शाखेचे निकाल ९६.९२ टक्के तर विज्ञान शाखेचे शंभर टक्के निकाल झाली आहे. कु.दिक्षा झळकी यांच्या यशाबद्दल रिपाइं प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे,जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले,तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी यांनी शुभेच्छा देण्यात आली आहे.



---

# पावसाळा सुरू होण्याअगोदर उल्हासनगर महानगरपालिकेचे आपत्कालीन परिस्थितीबाबत व्यवस्थापन समिती सदस्यांची बैठक

**उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे**

पावसाळा जवळ आल्याने पावसाळयात निर्माण होणा-या आपात्कालीन परिस्थितीबाबत आपत्ती व्यवस्थापन समितीमधील सर्व सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या शासकिय यंत्रणा म्हणजे महापालिका, पोलिस विभाग, ट्रफीक पोलिस, आर.टीओ, एम.एम.आर.डी.ए. , बी.एस.एन.एल., एम.आय.डी.सी. , एम एस ई बी,आरोग्य विभाग, सिव्हिल हॉस्पीटल्, अग्निशमन विभाग या सर्व विभागाची संयुक्त बैठक घेण्यात आली. त्यानुषंगाने मा. आयुक्त यांनी पुढील सुचना दिल्या.

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय तसेच प्रभाग समिती एक ते चार मध्ये आपत्ती निवारण नियंत्रण कक्ष २४*७ उघडण्याचे निर्देश सर्वप्रथम देण्यात आले.छोटे व मध्यम स्वरुपाचे नाले सफाईचे काम एक महिन्यापासून सुरु करण्यात आले असून ३८ मोठे नाले प्रोकलन व जेसीबीद्वारे करण्यात येत आहेत .काही छोटे नालेसफाईचे काम महापालिकेचे कर्मचारी यांचे मार्फत करण्यात येत आहे.व काही मोठे नाले मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री वापरुन ठेकेदारामार्फत सफाई करण्यात येत आहे. उर्वरीत काही छोट्या व मोठ्या नाल्यांची सफाई यापूर्वीच सुरु झालेली असून आजही सदर बैठकीमध्ये छोटया व मोठ्या नाल्यांची सफाई पावसाळा सुरु होण्यापूर्वीच करुन घेण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी आरोग्य विभागास दिले.चचठऊ- आणि बांधकाम खाते यांचे मार्फत चालू असलेल्या शहरातील सर्व रस्त्यांचे काम लवकरात लवकर करुन रस्त्यावरील असलेल्या खड्डे भरण्याचे कामही तातडीने पूर्ण करावे .यासाठी आवश्यक ती प्रक्रिया लवकरात लवकर करुन सदर कामाला सुरुवात करण्यात यावी.एम एस ई बी आणि महानगरपालिकेचा विद्युत विभाग, अग्निशमन विभाग यांनी धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करुन सदरची झाडे छाटण्याचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करावे जेणेकरुन कोणतीही विपरीत घटना घडणार नाही.



सार्वजनिक बांधकाम विभाग/ पाणीपुरवठा/सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी शहरातील रस्त्या वरील चालू असलेली आपापली संबंधित कामे लवकरात लवकर पूर्ण करुन सदरचे रस्ते तातडीने पूर्ण करुन नागरिकांच्या वापरासाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात यावेत. सर्व सहाय्यक आयुक्तांनी आढळलेल्या अति धोकादायक इमारतीना नोटीसा बजावून निष्कासनची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच दरड कोसळणे, धोकादायक पूल, पुरजन्य ठिकाणे इ. ठिकाणची पूर्व पाहणी करुन उपाययोजना करणे,डेंग्यू, मलेरिया या साथ रोग नियंत्रणासाठी साधा हिवताप जरी आला तरी ताबडतोब रक्त तपासणी करुन उपचार घ्यावेत, अशा सुचना मुख्य वैद्यकिय अधिकारी श्री. बनसोडे यांनी सदर बैठकीत दिल्या. व त्यांनी त्यांच्या रुग्णालयांतर्गत मांडलेल्या समस्यांवर उदा. झाडे कापने, ड्रेनेज लाईन इ. समस्या निराकरण करण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी अग्निशमन विभाग व आरोग्य विभाग यांना दिले

शहरातील सामाजिक संस्था छत्रञ यांना मा, आयुक्त यांनी आवाहन केले की, शहरात आपत्ती काळात मदती करीता व सहकार्य करण्यास पुढे यावे. स्वयंसेवकांनी आपत्ती व्यवस्थापनाशी संपर्क साधुन आपले नाव, पत्ता, मोबाईल नंबर द्यावा.

सदर बैठकीस अति. आयुक्त जमीर लेंगरेकर, उप आयुक्त किशोर गवस, उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव, मुख्य वेदयकिय अधिकारी श्री. सौरभ बनसोडे, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, एम.आय.डी.सो.चे अधिकारी/ कर्मचारी, अग्निशमन अधिकारी बाळू नेटके प्रभाग अधिकारी गणेश शिपी, दत्तात्रय जाधव, अनिल खतरानी, मनिष हिवरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा, वाहन व परिवहन प्रमुख विनोद केणे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख, यशवंत सगळे, सार्वजनिक बांधकाम विभाग, दिप्ती पवार पर्यावरण विभाग प्रमुख विशाखा सावंत, एम.एम.आर.डी.ए चे सल्लागार व कंत्राटदार, ट्रॅफीक विभागाचे प्रमुख पोलिस अधिकारी/कर्मचारी, बी.एस.एन.एल. , एम एस ई बी चे अधिकारी/ कर्मचारी इ. उपस्थित होते.

---

# रामकृष्ण मिशनने शाळांमध्ये जावून विद्यार्थ्यांना संस्कारित करावे : राज्यपाल रमेश बैस

## रामकृष्ण मिशन मुंबईच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शिक्षणाला मूल्यांची जोड नसली तर ते शिक्षण केवळ व्यक्तीचा अहंकार वाढवते. त्यामुळे शिक्षणाला मूल्य, नीतिमत्ता व मानवतेची जोड देणे गरजेचे आहे, असे सांगून रामकृष्ण मिशन मुंबईने शाळांशी रचनात्मक सहकार्य प्रस्थापित करावे, शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना संस्कारित करावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. मुंबईतील खार येथील रामकृष्ण मठ व मिशनच्या वर्षभर चाललेल्या शताब्दी वर्षाची सांगता आज बालगंधर्व रंगमंदिर वांद्रे येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला रामकृष्ण मिशन बेलूर मठ येथील उपाध्यक्ष स्वामी दिव्यानंद, सहायक सचिव बलभद्रानंद, मुंबई रामकृष्ण मठाचे अध्यक्ष सत्यदेवानंद, सुशीम दत्ता, शंतनू चौधरी तसेच रामकृष्ण मठाच्या विविध केंद्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रामकृष्ण मिशनचे संस्थापक स्वामी विवेकानंद महिला सक्षमीकरणाचे खंदे पुरस्कर्ते होते, असे सांगून रामकृष्ण मिशन मुंबई केंद्राने गरीब व वंचित महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम राबवून त्यांना आत्मनिर्भर बनवावे, असे आवाहन राज्यपाल श्री. बैस यांनी केले.

रामकृष मिशन ही आत्मोद्धारासोबत लोकहिताचे सामाजिक कार्य करीत असल्याबद्दल मिशनचे अभिनंदन करून मिशनने भारतातील युवकांसाठी कौशल्य विकास, क्रीडा विकास व समग्र व्यक्तिमत्व विकासासंबंधी उपक्रम राबवावे. तसेच वरिष्ठ नागरिक व दिव्यांगांच्या सशक्तीकरणाची योजना राबवावी, असे ही त्यांनी सांगितले.विविध आजारांच्या उपचारासाठी मुंबईत येणाऱ्या रुग्णांसाठी तसेच त्यांच्या नातलगांसाठी निवासी व्यवस्था असलेले 'माँ शारदा भवन' निर्माण केल्याबद्दल मिशनचे कौतुक करून रामकृष्ण मिशनतर्फे ठाणे येथे नवे केंद्र सुरु करण्यात येत असल्याबद्दल राज्यपाल श्री. बैस यांनी आनंद व्यक्त केला.



